दिनांक:- 5 NOV 2018

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**जाहिरात क्र.०६(Jun)/२०१८ अंतर्गत कल्याण अधिकारी (Welfare Officer) या पदाच्या रिक्त पदांवर नेमणूक करण्यासाठी कागदपत्रे जमा करणे व वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीता १:४ प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांनी दि.१९.११.२०१८ रोजी वैयक्तिक मुलाखतीस उपस्थित राहण्याबाबत.**

महानिर्मिती सरळसेवा जाहिरात क्र.०६(Jun)/२०१८अंतर्गत कल्याण अधिकारी (Welfare Officer) या पदाच्या रिक्त जागांच्या भरतीसाठी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणानुक्रमे व जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे अटी व शर्तीनुसार वैयक्तिक मुलाखत परीक्षे करीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी प्राप्त करुन घेण्याकरीता खालील ठिकाणी क्लिक ↵ करावे.

**कल्याण अधिकारी (Welfare Officer) या पदाकरिता वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी** ↵

वरील यादीतील उमेदवार वैयक्तिक मुलाखत परीक्षेस पात्र ठरलेले आहेत. उमेदवारांची वैयक्तिक मुलाखत परीक्षा दि.१९.११.२०१८ रोजी खालील ठिकाणी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. त्याच दिवशी सदरील उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे जमा करावयाची आहेत.

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,**
**प्रकाशगड, ६ वा मजला, अनंत काणेकर मार्ग,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१**
**दूरध्वनी क्रमांक :०२२-२४०२९०२२**

उमेदवारांनी कागदपत्र सादर करतेवेळी खालील अटी व शर्तीची पूर्तता करणे हि सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी असेल, याची सर्व उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

१) उमेदवारांची कागदपत्र जमा करण्याकरीताची निवड ही उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार तसेच उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, जात / जात वैधता प्रमाणपत्र, महिला आरक्षण, मराठी भाषा येत असल्याचा पुरावा,अधिवास प्रमाणपत्र इत्यादी माहितीच्या आधारे करण्यात आलेली असून त्याबाबतचे मूळ प्रमाणपत्रांची, कागदपत्रे जमा करतेवेळी तपासणी करण्यात येईल.

२) ज्या महिला उमेदवारांची कागदपत्र जमा करण्याकरीता व मुलाखत यादीतील निवड ही खुल्या प्रवर्गात महिला आरक्षणातंर्गत (WR) करण्यात आलेली आहे, अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातून महिला आरक्षणाकरीता लागू असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र जाहिरातीस अनुसरुन "कल्याण अधिकारी (Welfare Officer)" या पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले असणे व कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी वैध असणे आवश्यक आहे.

३) कल्याण अधिकारी (Welfare Officer) पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करीत नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींचा किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटीचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर तावडतोब रद्द करण्यात येईल.

४) जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांजवळ असलेली सर्व आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे (शैक्षणिक अर्हता व अनुभव वगळून) ही जाहिरातीस अनुसरुन कल्याण अधिकारी (Welfare Officer) या रिक्त पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेली असणे व कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी वैध असणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांजवळ आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे ही कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेली नसतील व कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी वैध नसतील अशा उमेदवारांची उमेदवारी ताबडतोब रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल महानिर्मिती कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही. तसेच उमेदवार जाहिरातीत नमूद शैक्षणिक अर्हता व अनुभव हा जाहिरातीस अनुसरुन कल्याण अधिकारी (Welfare Officer) पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत धारण करीत असणे आवश्यक आहे.

५) कल्याण अधिकारी (Welfare Officer) पदाच्या कागदपत्रे जमा करण्याकरीताची यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनीने राखून ठेवलेला आहे.

६) कल्याण अधिकारी (Welfare Officer) या पदाच्या रिक्त पदांवर नेमणूक करण्यासाठी कागदपत्रे जमा करणे व वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीता १:४ प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी ही मा.सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजूरीने प्रसिध्द करण्यात येत आहे.

७) कल्याण अधिकारी (Welfare Officer) यांच्या पदाकरीता मागास प्रवर्गातुन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या स्वत:च्या नावे असलेले महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असल्याचे (Domicile Certificate) कागदपत्रे जमा करण्याच्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले व कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी वैध असलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८) कागदपत्रे जमा करण्याकरीता उपस्थित राहताना उमेदवारांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे भरलेला अर्ज, त्यांची मूळ (Original) कागदपत्रे तसेच कागदपत्रांचा स्वसाक्षांकित (Self Attested) केलेले दोन छायांकित संच (Two Zerox copy set) स्वत:जवळ बाळगावे. तसेच आवश्यक सर्व कागदपत्रे घेऊनच उमेदवाराने कागदपत्रे जमा करण्याकरीता उपस्थित राहावे.

९) कागदपत्रे जमा करण्याकरीता उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनी वाम मार्गाचा अवलंब केल्याचे (जसे राजकीय दबाव, खोटी कागदपत्रे सादर करणे, धमकी देणे व इतर कोणतेही गैरकृत्य) निदर्शनास आल्यास उमेदवाराची निवड ही भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यांवर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

१०) मराठी भाषा येत असल्याचा पुराव्याचा नमुना प्राप्त करुन घेण्याकरीता उमेदवारांनी खालील ठिकाणी क्लिक करावे. माध्यमिक / शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा मॅट्रीक किंवा विद्यापीठ उच्च परीक्षा संबंधी मराठी भाषा विषय घेऊन उत्तीर्ण झाल्याचे दर्शविणारे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मंडळाचे किंवा संविधीक विद्यापीठाचे प्रमाणपत्र धारण करीत असणाऱ्या उमेदवारांनी मराठी भाषा येत असल्याचा पुरावा म्हणुन सदरची प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

११) कागदपत्रे जमा करण्याच्या दिवशी जे उमेदवार विहीत केलेल्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करणार नाहीत त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व कोणत्याही प्रकारचे निवेदन अथवा विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही, याबाबतची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१२) अयशस्वी उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महानिर्मिती कंपनीकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची महानिर्मिती कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**कल्याण अधिकारी (Welfare Officer) पदाच्या वैयक्तिक मुलाखत परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांनी कागदपत्रे जमा करण्याकरीता उपस्थित राहताना त्यांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे भरलेला अर्ज, त्यांचे मूळ (Original) कागदपत्रे तसेच कागदपत्रांचा स्वसाक्षांकित (Self Attested) केलेले दोन छायांकित संच (Two Zerox copy set) घेऊन कागदपत्रे जमा करण्याकरीता उपरोक्त नमूद ठिकाणी, दिवशी व वेळेवर उपस्थित राहावे. नमूद दिनांक व वेळेनंतर कागदपत्रे जमा करण्याकरीता उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.**

| पदाचे नाव | दिनांक | वेळ | उपस्थित राहण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| कल्याण अधिकारी (Welfare Officer) | १९.११.२०१८ | सकाळी १०.०० वाजता | महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, प्रकाशगड, ६ वा मजला, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१<br>दूरध्वनी क्रमांक : ०२२-२४०२९०२२ |

कल्याण अधिकारी (Welfare Officer) या पदाच्या उमेदवारांच्या कागदपत्रे जमा करणे व वैयक्तिक मुलाखत परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांमधून सामाजिक व समांतर आरक्षणातंर्गत अंतिम निवड सूची यादी तयार करण्यात येईल. सदरची यादी उमेदवारांच्या माहिती करीता महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(विनोद बोंदरे)
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती

Click Here To Download Marathi Performa